# लातूर शहर महानगरपालिका, लातूर

## दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान

## DAY-NULM

# लातूर शहर महानगरपालिका, लातूर
# दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY-NULM)

दारिद्र्य रेषेखालील/ शहरी गरीब लाभार्थ्यांनाआर्थिक, सामाजिक सक्षमीकरण करण्याच्या अनुषंगाने अभियानाच्यामाध्यमातून खालीलप्रमाणे लाभ देण्यात येते

- बचत गट स्थापन करणे, त्यांना खेळते भांडवल उपलब्ध करून देणे,
- वस्ती स्तर संघ व शहर स्तर संघ स्थापन करणे
- वैयक्तिक स्वयरोजगार, समूह व बचत गटांना कर्ज योजना
- महिला बचत गटांना प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना(PMFME)
- शहर उपजीविका केंद्राची निर्मित करणे
- हातगाडी/ फेरीवाले/ पथविक्रेते यांना संरक्षण व उपजीविकेच्या माध्यमातून सर्वेक्षण करणे, स्मार्ट ओळखपत्र , व्यवसाय परवाना देणे,
- प्रधानमंत्री स्वनिधी योजने अंतर्गत शासनाच्या प्रधानमंत्री जिवनज्योती योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जनधन योजना व रुपे कार्ड, प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना, एक राष्ट्र एक राशन कार्ड, जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृवंदना योजनाचा लाभ देणे
- नागरी बेघर बांधवांसाठी बेघर निवारा सुरू करणे,
- कौशल्य विकास [illegible]च्या माध्यमातून मोफत कौशल्ये प्रशिक्षण देणे.

# लातूर शहर महानगरपालिका, लातूर
# दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY-NULM)

**अभियानाचे उद्देश :-**

- नागरी गरीब लोक, त्यांच्यासंस्थांची क्षमता बांधणी करणे, उपजीविकेचा विकास व नागरी दारिद्र्य निर्मूलन करणारी यंत्रणा यांची क्षमता वाढविणे
- नागरी गरीब कुटुंबातील व्यक्तींना उपजीविकेच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देणे
- बाजारच्याऔद्योगिक गरजेनुसार व आवश्यकतेनुसार, विविधक्षेत्राच्या गरजा लक्षात घेऊन नागरी गरीब व्यक्तींना कौशल्ये विकासाचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार व स्वयरोजगारचीसंधी उपलब्ध करून देणे.
- नागरी गरिबांच्यालघु उद्योगांना चालना देणे
- नागरी बेघर लोकांसाठी कायमस्वरूपी व मूलभूत सोयी सुविधा असलेल्या निवाऱ्याची सोय करणे
- नागरी फेरीवाल्यांच्या उपजीविकेच्या समस्या सोडवून त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे

दारिद्र्य रेषेखालील महिला तर 30% बिगर दारिद्र्य रेषेखालील महिला एकत्र येऊन बचत गट स्थापन करण्यात येतो. या बचत गटाला विविध प्रकारचे क्षमता बांधणी उद्योजकता जाणीव जागृती कार्यक्रम तर उद्योजकता विकास प्रशिक्षणाच्या माध्यमातून महिलांना सक्षम बनविण्यात येते. बचत गट नियमित व अखंड सुरू राहावे व गट हा सशक्तीकरणाच्या प्रवाहामध्ये येण्यासाठी १. नियमित बैठका घेणे २. नियमित बचत जमा करणे ३. रेकॉर्ड अद्यावत करणे ४. नियमित अंतर्गत व्यवहार करणे ५. नियमित परतफेड करणे या पंचसूत्रीचा अवलंब केला जातो.

2. **फिरता निधि वाटप करणे :-** जो गट पंचसूत्रीचा अवलंब केला जातो आणि गटाला किमान तीन महिने पूर्ण झाले असेल अशा बचत गटांना अभियानाच्या माध्यमातून रु. १०००/० फिरता निधि उपलब्ध करून देण्यात येते.

3. **बचत गटांना कर्ज :-** पंचसूत्रीचा अवलंब करणाऱ्या बचत गटांना लहुद्योग व गृहद्योग करण्यासाठी वित्तीय सहाय्य करणाऱ्या बँक / वित्तीय संस्थांकडून अल्प व्याजदराने (बँकेचे नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या बचत गटाला बँकेच्या व्याजदराच्या ७% च्या वरील व्याज हे व्याज अनुदान म्हणून दिले जाते) कर्ज उपलब्ध करून देण्यात येते

4. **वस्ती स्तर संघाची स्थापना करणे :-** त्या त्या वस्तीमधील 10-20 बचत गटामधील एक प्रतींनिधी यांची महिलांमधून निवड करून वस्ती स्तर संघ म्हणून त्याची मा. धर्मादाय आयुक्त कार्यालय येथे नोंदणी करण्यात येते व संघाची स्थापना होऊन सहा महीने पूर्ण झाले की त्याचे मूल्यांकन करून रु.50000/- खेळते भांडवल उपलब्ध करून दिले जाते.

5. **शहर स्तर संघ स्थापन करणे :-** लोकसंख्येनुसार स्थापन केलेल्या वस्ती स्तर संघामधून शहर स्तर संघाची मा. धर्मादाय आयुक्त कार्यालय येथे नोंदणी करण्यात येते, या संघांना स्वबळावर उभे राहण्यासाठी उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध करून देणे, महिलांचे एक स्वतंत्र हक्काचे व्यासपीठ तयार तयार करून ... अस्तित्वाला वाव देण्याची महत्त्वाची भूमिका शहर स्तर संघ

उपलब्ध व्हावे यासाठी शहर उपजीविका केंद्राची निर्मित करणे जेणेकरून उत्पादित वस्तूंना बाजारपेठ मिळेल व महिलांना लघूद्योग/ गृहद्योग करण्यास प्रेरणा मिळेल. सदर अभियनाच्या माध्यमातून निर्माण झालेल्या सेवा

7. **प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (PMFME) :-** अन्न प्रक्रिया उद्योग करणाऱ्या महिला बचत गटांना प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना(PMFME) याच्या माध्यमातून अल्प व्याजदराने निधि उपलब्ध करून देणे

8. **वैयक्तिक स्वयरोजगार :-** या माध्यमातून व्यक्तीगतरित्या शहरामधील शहरी गरीब/ दारिद्र्य रेषेखालील लाभर्थ्यांनाव्यवसाय करण्यासाठी बँकेच्या माध्यमातून अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे त्यांना या कर्जावरील व्याजामध्ये व्याज अनुदान परतावा देणे (बँकेकडून आकारल्या जाणाऱ्या व्याजामध्ये ७% च्या वरील व्याज हे अभियानामधून व्याज अनुदान म्हणून दिले जाते)

9. **समूह कर्ज योजना** :- यामध्ये समान व्यवसाय करणाऱ्या पाच व्यक्तींनी एकत्र येऊन व्यवसाय करणे अपेक्षित असून त्यांना बँकेच्या माध्यमातून कर्जाची उपलब्धता करून देणे व या कर्जावरील व्याजामध्ये व्याज अनुदान परतावा देणे.

10. **मोफत कौशल्ये प्रशिक्षण :-** शहरी गरीब/ दारिद्र्य रेषेखालील व १८वर्ष पूर्ण असलेल्या युवक-युवतींना, महिला व पुरुष यांना बेरोजगार म्हणून गणले जाऊ नये म्हणून त्यांना स्वबळावर/ स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी कौशल्य विकास योजनेच्या माध्यमातून

व्यवसाय परवाना देणे व शासनाच्या इतर योजनेचा लाभ उपलब्ध करून देणे.

12.**PMSVANidhi :** - या उपांगाच्या माध्यमातून केंद्र शासनाच्या वतीने कोविड-19 मुळे बहुतांश पथविक्रेत्यांचा व्यवसाय हा संकटामध्ये आल्याने त्यांना बँकेच्या माध्यमातून छोट्या प्रमाणात म्हणजेच प्रथम कर्ज रु.10000/- द्वितीय कर्ज रु.20000/- व तृतीय कर्ज रु.50000/- उपलब्ध करून देण्यात येऊन त्यांना व्याज अनुदान परताव्याचा लाभ देण्यात येतो. सदर फेरीवाल्यांचे कौटुंबिक सर्वेक्षण करून त्यांची पात्रता तपासून त्यांना शासनाच्या इतर योजना उदा. प्रधानमंत्री जिवनज्योती योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जनधन योजना व रुपे कार्ड, इमारत व इतर बांधकाम अंतर्गत नोंदणी करणे, प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना, एक राष्ट्र एक राशन कार्ड, जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना या योजनाचा फायदा मिळवून देण्यासाठी दुसऱ्या टप्प्यामध्ये स्वनिधी से समृद्धि योजना सुरू आहे.

**13. नागरी बेघरांना सहाय्य :-** या उपांगाच्या माध्यमातून शहरामध्ये सार्वजनिक ठिकाणी, उघड्यावर राहणारे, पूलाखाली, उंच इमारतीच्याआश्रयास, मंदिर, मस्जिद, बस व रेल्वे स्थानक येथे वास्तव्यास असणारे व एकूणच त्यांना कोणताही आधार नसलेल्या नागरी बेघर बांधवांसाठी नागरी बेघर निवारासुरू करून त्यांना शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देणे.

| DEENDAYAL ANTYODAY YOJANA- NATIONAL URBAN LIVELIHOOD MISSION<br>FY 2022-23 | | | | |
|---|---|---|---|---|
| **A** | **Components & Componentwise Activity** | **Target** | **Achievent** | **%** |
| **Social Mobilization & Institution Development (SM&ID)** | | | | |
| a | SHGs to be formed | 50 | 51 | 102 |
| b | SHGs to be Assisted With RF | 92 | 49 | 53 |
| c | ALFs to be Assisted With RF | 2 | 2 | 100 |
| **B** | **Self-Employment Programme (SEP)** | | | |
| a | Self-Employment Programme - SEP (I) | 43 | 43 | 100 |
| b | Self-Employment Programme - SHG Bank Linkage | 35 | 128 | 366 |
| | **Support For Urban Street Vendor** | | | |
| a | Street Vendor Identify Card and Certificate | 1783 | 1383 | 81 |

# PMSVANidhi ( Prime Minister Street Vender Atmnirbhar Nidhi )

## प्रधानमंत्री पथ विक्रेता आत्मनिर्भर निधी योजना

नगर पथ विक्रेता अनौपचारिक नागरी अर्थव्यवस्थेचा अत्यंत महत्वाचा घटक आहे नगरवासीयांना आर्थिक कुवतीप्रमाणे स्वस्त दरात वस्तू व सेवांची उपलब्धता सुनिश्चित करण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावतात. त्यांना पथविक्रेता, फेरीवाला, ठेलेवाला, फेरीवाला ई. नावाने विविध भागांमध्ये ओळखले जाते. त्यांच्याद्वारे पुरविल्या जाणाऱ्या वस्तूंमध्ये उदा. भाज्या, फळे, तयार खाद्य पदार्थ, चहा, भजी, पाव, अंडी, कापड, वस्त्र, चप्पल, कारागिराद्वारे उत्पादित वस्तू, पुस्तके/ स्टेशनरी ई. चा समावेश होतो. कोविड-19 (साथीचा रोग) सर्वत्र पसरलेला असल्यामुळे आणि परिणामी टाळेबंदीमध्ये ( Lockdown ) पथविक्रेत्याच्या उपजीविकेवर विपरीत परिणाम केला आहे. बहुदा ते कमी भांडवलावर पथविक्री करतात आणि जे काही भांडवल ज्यांच्याकडे होते तेही या टाळेबंदीमध्ये (Lockdown ) शिल्लक राहण्याची शक्यता कमीच आहे. त्यामुळे पथविक्रेत्याना त्यांचा व्यवसाय पुन्हा सुरू करण्यासाठी सदर योजना चालू करण्यात आली. ही केंद्र शासन पुरस्कृत योजना आहे.

**योजनेची उद्दिष्टे**

1. रु. 10000/- पर्यंतचे खेळते भांडवल कर्ज उपलब्धता
2. नियमित परतफेड करण्यासाठी प्रोत्साहन देणे
3. डिजिटल व्यवहारास प्रोत्साहन देणे
4. पहिले 10000/- कर्ज नियमित परतफेड करणाऱ्यांना 20000/- चे दुसरे कर्ज व 20000/- चे कर्ज नियमित परतफेड

| PMSVANidhi - सन 17 जून 2020 ते 2022-23 ( सप्टेंबर2022 पर्यन्त ) केलेले साध्य | | | |
|---|---|---|---|
| S.N. | Subject | Detail ( Numbers ) | Amount ( in Lakhs ) |
| 1 | Target ( revised ) | 6900 | 699.00 |
| 2 | Application sent to bank | 3418 | 341.80 |
| 3 | Sanction | 3192 | 319 2 |
| 4 | Disbursed | 2887 | 288 7 |
| 5 | Return by bank | 67 | - |
| 6 | First Loan Closed | 1315 | - |
| 7 | Second Loan Disbured | 226 | 45 2 |
| 8 | Sanction but not Disbursed | 305 | - |
| 9 | First Loan total Cash back paid | - | 1.00 |
| 10 | First Loan total interest subsidy paid | | 6.00 |
| 11 | Second Loan Cash back paid | - | 1.00 |

# धन्यवाद!